433

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व. का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक ०३/१०/२०२४

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र. एपीओ-०३१६/प्र.क्र.१०४/भाग-१/पोल-३, दि. ०१/१०/२०२४.

**विषय** :- मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालयाकरिता दुसऱ्या टप्प्यातील एकूण १०८२ पदे निर्माण करण्यास व त्यानुषंगाने येणाऱ्या आवर्ती व अनावर्ती खर्चास मान्यता देणेबाबत.

******

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र. एपीओ-०३१६ / प्र.क्र.१०४ / भाग-१ / पोल-३, दि.०१/१०/२०२४ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४१००११५०६४१२६२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिरखे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का.)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर-वसई-विरार.
कार्यासन अधिकारी, का.क्र. २६-ब

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके " वेतन/भत्ते " या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस अयुक्तालयाकरिता दुस-या टप्प्यातील एकूण १०८२ पदे निर्माण करण्यास व त्यानुषंगाने येणा-या आवर्ती व अनावर्ती खर्चास मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एपीओ-०३१६/प्र.क्र.१०४/भाग-१/पोल-३**

मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई
दिनांक : ०१ ऑक्टोबर, २०२४.

**संदर्भ** :-

१) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक एपीओ-०३१६/प्र.क्र.१०४/पोल-३, दिनांक १३.०९.२०१९.

२) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाचे पत्र क्र.पोमसं/२६-ब पोआ/मिभाववि/दुसरा टप्पा/पदनिर्मिती/१२७/२०२२, दिनांक ३०.०६.२०२३, दि.१६.०१.२०२४.

३) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अध्यक्षतेखालील दि.०९.०७.२०२४ रोजी झालेल्या सन २०२४ मधील पहिल्या बैठकीचे कार्यवृत्त.

**प्रस्तावना** :-

पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण व पोलीस अधीक्षक, पालघर यांच्या कार्यक्षेत्राचे विभाजन करुन, मिरा-भाईंदर-वसई-विरार परिसराकरिता स्वतंत्र "मिरा-भाईंदर-वसई-विरार" पोलीस आयुक्तालय निर्माण करण्यास संदर्भाधीन क्र.१ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

२. उक्त शासन निर्णयासोबतच्या "परिशिष्ट-ब" मध्ये नमूद केलेली १०२२ पदे पहिल्या टप्प्यात निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली होती. व "परिशिष्ट-ब१" मध्ये नमूद दुस-या टप्प्यातील पदनिर्मितीकरिता प्रस्ताव उप समिती व उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेनुसार करण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता.

३. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाने संदर्भाधीन क्र.२ द्वारे मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालयाकरिता एकूण १०८२ पदे निर्माण करण्याचा व त्यानुषंगाने येणा-या आवर्ती व अनावर्ती खर्चास मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

४. त्यानुसार उक्त प्रस्तावास अपर मुख्य सचिव (सेवा/सा.प्र.वि.) व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव (व्यय/वित्त विभाग) यांच्या अध्यक्षतेखालील उपसमितीच्या दि.१५.०४.२०२४ रोजीच्या बैठकीत व मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील दि.०९.०७.२०२४ रोजी झालेल्या उच्च स्तरीय सचिव

समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. त्यानुषंगाने मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालयाकरिता दुस-या टप्प्यातील एकूण १०८२ पदे निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

**<u>शासन निर्णय</u>:-**

मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालयाकरिता शासन निर्णयासोबतच्या "परिशिष्ट-अ" मध्ये नमूद केल्याप्रमाणे दुस-या टप्प्यातील एकूण १०८२ नियमित पदे निर्माण करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. तसेच त्यानुषंगाने येणा-या रु.६२,०३,९९,०४०/- (रुपये बासष्ट कोटी तीन लाख नव्याण्णव हजार चाळीस फक्त) इतक्या आवर्ती खर्चास व रु.५,७४,४८,६००/- (रुपये पाच कोटी चौ-याहत्तर लाख अठ्ठेचाळीस हजार सहाशे फक्त) इतक्या अनावर्ती खर्चास शासन मान्यता देण्यात येत आहे.

३. उक्त आवर्ती व अनावर्ती खर्च हा त्या त्या वर्षीच्या उपलब्ध मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. उक्त शासन निर्णय मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय सचिव समितीच्या दिनांक ०९.०७.२०२४ रोजी झालेल्या सन २०२४ मधील पहिल्या बैठकीतील मान्यतेनुसार व वित्त विभागाच्या सहमतीने अनौसं क्र.५४१/आपुक, दिनांक १९.०९.२०२४ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. उक्त शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४१००११५०६४१२६२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA T BHALWANE

Digitally signed by RAJENDRA T BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931d2758148ccaa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD514095659A6CDFAC856815518DCD188C23A, cn=RAJENDRA T BHALWANE
Date: 2024.10.01 14:52:53 +05'30'

**( रा. ता. भालवणे )**
**उप सचिव, गृह विभाग**

**प्रत,**

मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (वित्त),वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर-वसई-विरार.

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

निवासी लेखा परीक्षा अधिकारी,वांद्रे,मुंबई.

जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे/पालघर.

उप सचिव(पोल ३/अर्थसं-१),गृह विभाग,मंत्रालय,मुंबई.

वित्त विभाग (व्यय-७)/वित्तिय सुधारणा-१/आ.पु.क.

निवड नस्ती, पोल-३.

शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक एपीओ-०३१६/प्र.क्र.१०४/भाग-१/पोल-३,
दिनांक : ०१ ऑक्टोबर, २०२४. चे सहपत्र.

**"परिशिष्ट-अ"**

मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालयाकरिता दुस-या टप्प्यात
नव्याने निर्माण करण्यात येणा-या पदांचा तपशील

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | मंजूर पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | सहायक पोलीस उप निरीक्षक | एस-१० : २९२००-९२३०० | ९७ |
| २ | पोलीस हवालदार | एस-९ : २६४००-८३६०० + विशेष वेतन रु.७५०/- | १५६ |
| ३ | पोलीस शिपाई | एस-७ : २१७००-६९१०० + विशेष वेतन रु.७५०/- | ६८९ |
| ४ | चालक सहायक पोलीस उप निरीक्षक | एस-१० : २९२००-९२३०० | ११ |
| ५ | चालक पोलीस हवालदार | एस-९ : २६४००-८३६०० + विशेष वेतन रु.७५०/- | १७ |
| ६ | चालक पोलीस शिपाई | एस-७ : २१७००-६९१०० + विशेष वेतन रु.७५०/- | ७७ |
| ७ | कार्यालय अधीक्षक | एस-१४ : ३८६००-१२२८०० | १ |
| ८ | लघुलेखक निम्नश्रेणी | एस-१५ : ४१८००-१३२३०० | २ |
| ९ | प्रमुख लिपिक | एस-१३ : ३५४००- ११२४०० | २ |
| १० | वरिष्ठश्रेणी लिपिक | एस-८: २५५००-८११०० | ५ |
| ११ | पोलीस उप निरीक्षक, मोटार परिवहन तांत्रिक | एस-१४ : ३८६००-१२२८०० | २ |
| १२ | सहायक फौजदार, तांत्रिक | एस-१० : २९२००-९२३०० | २ |
| १३ | सहायक फौजदार, १ मेकॅनीक ग्रेड | एस-१० : २९२००-९२३०० | २ |
| १४ | पोलीस हवालदार, २ मेकॅनीक ग्रेड | एस-९ : २६४००-८३६०० | ६ |
| १५ | सहायक फौजदार, ३ मेकॅनीक ग्रेड | एस-९: २६४००-८३६०० | ६ |
| १६ | पोलीस शिपाई, हेल्पर | एस-७ : २१७००-६९१०० + विशेष वेतन रु.७५०/- | ५ |
| १७ | पोलीस नाईक इलेक्ट्रीशन | एस-८ : २५५००-८११०० + विशेष वेतन रु.७५०/- | २ |
| | एकूण | | १०८२ |

*****